**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत**
**पाणी गुणवत्ता बाधित गावांसाठी १०%**
**लोकवर्गणी घेण्याची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :ग्रापापु-१००१/ प्र.क्र. ३०४ / पापु- ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर, २००१**

**वाचा :-१)** शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्र.ग्रापापु-१०९९/प्र.क्र-३२८/ पापु-०७. दिनांक २७ जुलै, २०००.

**२)** शासन निर्णय. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-१९०/ पापु-०७. दिनांक ३ सप्टेंबर २००१.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यातील संपूर्ण कार्यक्रमांसाठी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमात लोकसहभागाचा एक भाग म्हणून योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलणे बंधणकारक करण्यात आले आहे.

२. राज्यातील काही भागामधील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत हे गुणवत्ता बाधित असल्यामुळे व जवळपास शुध्द पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसल्याने त्या गावास/ वाडीस पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी फार दुरुन पाणी आणावे लागते परिणामी योजनेच्या खर्चात वाढ होते. पिण्याचे पाणी गुणवत्ता बाधीत असलेल्या गावातील/ वाडीतील लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्यास त्यांच्याकडून या फार दुरुन आणाव्या लागणा-या पाण्यासाठीच्या खर्चाचा १०% भाग रोख जमा करणे शक्य होणार नाही. यास्तव राज्यातील ज्या गावातील / वाडयातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता रासायनीक बाबींमुळे बाधीत झालेली असेल व त्या गावास/ वाडीस जवळपास म्हणजे १.५ किमी च्या आत रासायनीक प्रदुषण विरहीत शुध्द पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होत नसेल तर अशा गावाने/ वाडीने दुरुन पाणी आणून पिण्याच्या पाण्याची योजना हाती घेण्यास हरकत नाही.

तथापि अशा योजनेच्या एकूण भांडवली खर्चापैकी योजनेच्या **स्त्रोतापासून ते वितरण व्यवस्थेच्या मुख्य टाकी पर्यंतचा (टाकीचा खर्च वगळून) भांडवली खर्च वजा करुन योजनेच्या उर्वरित भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी जमा करावा. शासनाच्या सहभागाचा विचार करताना १.५ कि.मी. च्या पुढे मंजूर**



८३९

**अंदाजपत्रकाप्रमाणे आवश्यक संपूर्ण खर्च ग्रामस्थांना देण्यात येईल. मात्र ग्रामस्थांनी संपूर्ण योजनेतील श्रमदानातून होऊ शकणा-या जास्तीत जास्त बाबी स्थानिक सहभागातून करण्याचा प्रयत्न करावा. वरील शासन आदेशातील इतर सर्व अटी बंधनकारक असतील.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्य मंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त सर्व
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
उपमुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. (सर्व)
जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा परिक्षण)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा अनुज्ञेयता)
उप अभियंता. पाणी पुरवठा उप विभाग. जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नवी मुंबई
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नाशिक. पुणे. औरंगाबाद. अमरावती व नागपूर
वित्त विभाग. मंत्रालय. मुंबई
नियोजन विभाग. मंत्रालय. मुंबई.
ग्रामविकास व जलसंधारण विभाग. मंत्रालय. मुंबई
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.